# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## मिळकत विभाग

**प्रस्तावना**

**विषय- भिवंडी महानगरपालिका शिवाजी चौक येथील सन १९९१ रस्ता रुंदी करणामध्ये तोडलेल्या गाळयांचे पुर्नवसन करण्यात आले व त्या नंतर नोटिस न देता बेकायदेशीर रित्या तोडण्यात आले असता १४ गाळे धारकांना त्याच ठिकाणी पुर्नवसन करणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील शिवाजी चौक येथे सन १९९१ रस्ता रुस्ता रुंदीकरणा मध्ये तोडलेल्या गाळयांचे नगरपरिषद मा.महासभा ठराव क्र.४८७ दि.१७/०३/१९९२ च्या ठरावानुसार प्रभाग समिती क्र.०५ च्या कार्यक्षेत्रातील गाळे धारकांना कांबा रोड अजयनगर येथे तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागा देण्यात आली आहे. तसेच महानगरपालिका मार्फत रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित झाल्याने दि.२४/०१/२०२० रोजी मनपा मार्फत निष्कासीत केलेले आहेत.

मा.श्री.संजय रायमुलकर (मेहेकर) रा.विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेले विधानसभा लक्षवेधी सुचना क्र.१४७७ मध्ये गाळे धारकांना अन्य ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सन २०२२ च्या तिसरे (हिवाळी) अधिवेशनात उपलब्ध करुन देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता त्या अनुषंगाने मनपाने १४ गाळे धारकांना पुर्नवसीत करण्याचे प्रस्तावीत असल्याचे दि.१७/०३/२०२३ अन्वये मा. विधी मंडळास लेखी कळविले आहे.

त्यानंतर १४ गाळे धारकांपैकी जागा उपलब्ध न केल्यामुळे १२ गाळे धारकांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१०६३०/२०२३ दावा दाखल करुन महानगरपालिकेत पुर्नवसन करण्याची मागणी केली होती. न्यायालयीन निर्णयानुसार जागा उपलब्ध करुन न दिल्यामुळे मा.उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र.२२४०२/२०२४ दाखल करण्यात आलेली आहे. त्यानुसार १४ आश्वासित गाळे धारकांची नांवे १. आदर्श प्रिटींग प्रेस तर्फे रामु नागो भोईर २. विजय लक्ष्मण वेल्हाळ ३. अरविंद तुकाराम घोडके ४. रामचंद्र भाऊ नवले तर्फे नातु प्रमोद नवले ५. राधाकृष्ण माडकर तर्फे महेंद्र माडकर ६. विनायक द्वारकानाथ कोंडलेकर ७. गुलाम दस्तगीर बुबेरे ८. पुरुषोत्तम कन्हालाल मनुजा, तर्फे व्यवस्थापक राजेंद्र विष्णु पातकर (दावा दाखल नाही) ९. जसवंतराय दयालुमल मनुजा १०. निसार पाववाल तर्फ व्यवस्थापक सुनिता गुप्ता ११. बाळकृष्ण केशव तुपसाखरे तर्फे मुलगा वैभव बाळकृष्ण तुपसाखरे (दावा दाखल नाही) १२. कैलास पुरुषोत्तम कोपलवार, तर्फे संदीप पुरुषोत्तम कोपलवार १३. शितलादेवी ट्रस्ट १४. हसमतराय भटीजा, तर्फे व्यवस्थापक संजय त्रिकनभाई परमार इतके गाळे धारक असुन सदर गाळे धारकाकडुन १५ दिवसात आपली गाळा धारक असल्याचे कागदपत्र सादर केल्यानंतर सदर कागदपत्राची छाननी करुन नियमानुसार गाळा पुर्नवसन करण्यात येईल.

त्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.५ च्या कार्याक्षेत्रातील शिवाजी चौक कांबा रोड,अजयनगर येथील १४ गाळे धारकांस पुर्नवसन करणेकामी प्रस्तावास या मिळकत व्यवस्थापक, मा.नियंत्रण अधिकारी(मिळकत विभाग) मा.सहाय्यक संचालक नगररचना सो. मा.उपायुक्त मुख्यालय सो. यांच्या शिफारशीनुसार अजयनगर रोड येथील मनपाचे सविता जगताप मार्केट येथे तयार असलेल्या ठिकाणी देण्याबाबत मान्यता दिलेली आहे.

या प्रस्तावास मिळकत व्यवस्थापक, मा.सहा.नगररचना यांच्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त सो.महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एम.सी ओ.२०२० / प्र.क्र७१ (भाग -२) नवि-१४ दि.६

जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत त्या मुळे भिवंडी शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा १९४९ कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकीय ठराव व संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो .यांना आहेत.

**ठराव क्र.** 1008 **दिनांक** 20/12/ **२०२४**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.५ च्या कार्याक्षेत्रातील शिवाजी चौक कांबा रोड,अजयनगर येथील १४ गाळे धारकांस पुर्नवसन करणेकामी प्रस्तावासमिळकत विभाग प्रमुख, नियंत्रण अधिकारी (मिळकत विभाग), सहा.नगररचना यांच्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त सो.महोदय यांनी दिलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय यांचे कडील शासनआदेश क्र.एम.सी ओ.२०२० / प्र.क्र७१ (भाग -२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ रोजी नुसार अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यातील तरतुदीच्या वि शेषत कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वि.वैदय प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.५ च्या कार्याक्षेत्रातील शिवाजी चौक कांबा रोड,अजयनगर येथील १४ गाळे धारकांचे कागदपत्राची छाननी करुन नियमानुसार **सविता जगताप मार्केट** येथे पुर्नवसन करण्यात येईल. या बाबत प्रस्तावास मा.प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैदय)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**